# अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर

## करारबध्द पध्दतीने मानधनावर थेट मुलाखतीव्दारे नेमणुकी बाबत

## (Walk In Interview)

मा.प्रधानमंत्री आवास योजना-2.0 (शहरी) शहरस्तरीय तांत्रिक कक्ष (CLTC) करिता अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागासाठी करारबध्द पध्दतीने सहा महिन्याच्या कालावधी करिता दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात नियुक्तीकरिता खालील दर्शविलेल्या पदांवर पात्र अर्जदारांच्या थेट पध्दतीने मुलाखती आयोजित करण्यात येत आहेत.

तरी संबंधित पात्र अर्जदार धारकांनी शैक्षणिक पात्रता, अनुभव दाखला व तद्नुषंगिक आवश्यक सर्व प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतीसह जोडलेला अर्ज मा.आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे नावे करुन अर्जासह दिनांक 17 / 03 / 2025 रोजी सकाळी 10:00 वाजता समक्ष आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रासह मा. आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका, छत्रपती संभाजी नगर रोड, अहिल्यानगर या कार्यालयामध्ये थेट पध्दतीने मुलाखतीसाठी उपस्थित रहावे, उशिरा आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही. सदर करारबध्द पध्दतीने नियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | दरमहा मानधन रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | सिव्हील इंजिनियर | 1 | मान्यता प्राप्त विद्यापिठातुन बीई सिव्हिल हि पदवी उत्तीर्ण व प्रत्यक्ष कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक | 45,000/- |
| 2 | एमआयएस स्पेशालिस्ट | 1 | बोर्ड ऑफ टेक्निकल एजुकेशन मान्यता प्राप्त तंत्रनिकेतन कॉलेज मधुन डिप्लोमा इन कॉम्प्युटर सायन्स इंजिनियरींग हि पदविका उत्तीर्ण व प्रत्यक्ष कामाचा किमान 3 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक. | 35,000/- |

### मानधनावर नियुक्तीसाठी अटी व शर्ती

1. संबंधितांची सदरची नियुक्ती मासिक वेतन तत्वा:प्रमाणे करारबध्द पध्दतीने तात्पुरत्या स्वरुपातील सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये असल्याने मा. प्रधानमंत्री आवास योजना-2.0 (शहरी) शहरस्तरीय तांत्रिक कक्ष (CLTC) करिता प्राप्त होणा-या अनुदानातुन सदरचे संबंधित नियुक्तीधारकास मासिक वेतन प्रकल्प विभागा मार्फत अदा करण्यात येईल.
2. सदर मासिक वेतना व्यतिरिक्त शासन सेवा व शर्ती अंतर्गत महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती व अटी) नियम 1981 नुसार सदरची नियुक्ती नसल्याने त्यानुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन,विमा योजना,भविष्य निर्वाह निधी, तसेच कायम सेवेच्या कोणत्याही प्रकारचे लाभ नियुक्तीधारकास अनुज्ञेय राहणार नाहीत.
3. निवड झाल्यानंतर नियुक्तधारकांनी मासिक मानधनावर करारबध्द पध्दतीने रुजु होणे पुर्वी मा.पोलिस प्राधिका-यांकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र व मा.जिल्हा शल्य चिकित्सक,अहिल्यानगर यांचेकडील सक्षम असलेबाबतचे प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.
4. सदर उमेदवारांची निवड ही त्यांची शैक्षणीक अर्हताचे गुण, अनुभव, समितीचे मुलाखतीचे गुण यांचे प्रमाण ठरवुन निवड यादी मनपाच्या संकतेस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
5. नियुक्तीधारकांचे सदर करारबध्द नियुक्ती कालावधीतील काम समाधानकारक न आढळल्यास व त्यांचे सेवा विषयक काही तक्रारी उदभवल्यास पुर्वसुचना न देता दिलेली मानधनावरील करारबध्द पध्दतीने नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल व त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित नियुक्ती धारकावर राहील.

Scanned with OKEN Scanner

6. सदर निवड झालेल्या संबंधितांची मासिक मानधनावरील करारबध्द नियुक्तीचा कालावधी समाप्तीनंतर त्यांना कोणतेही अधिकार राहणार नाहीत.
7. सदर नियुक्ती पुर्णतः मासिक मानधन तत्वानुसार कराराप्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात असल्याने सदर नियुक्ती कालावधी संपुष्टात आल्यानंतर सेवेत कायम नियुक्ती होणेबाबत व कायम सेवेचे कुठल्याही प्रकारचे फायदे मिळणे करिता नियुक्तीधारकास मा. न्यायालयात अथवा मा.उच्च न्यायालयात दाद मागता येणार नाही, सदरची मुदत संपल्यानंतर सदरचा करारबध्द नियुक्ती आदेश हा अपोआप व्यपगत होईल.
8. नियुक्त झालेल्या संबंधितांना नियुक्ती मानधनावरील कालावधीमध्ये कार्यालयीन परवानगी शिवाय त्यांना कार्यक्षेत्र सोडता येणार नाही.
9. निवड झालेल्या संबंधितांना सदर नियुक्ती कालावधीतील मानधनावरील सेवेचा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा मा.आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका यांचेकडे 15 दिवसाच्या आत त्यांना याबाबत पुर्व सुचना म्हणुन नोटीस दयावी लागेल.
10. सदर मासिक वेतन कालावधीतील नियुक्ती करिता संबंधितांनी दिलेली माहिती खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यास उपरोक्त करारबध्द नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येवुन सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच संबंधित उमेदवारांनी यापुर्वी नोकरी बाबत अर्ज दिलेला असल्यास यापुर्वीचा तो अर्ज ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.
11. विवाहीत असल्यास एक पती किंवा एक पत्नी असावे.
12. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 05 मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना अ (नियम 4) अपत्याबाबतचे प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.
13. तात्पुरत्या स्वरुपात सदर करारबध्द नियुक्ती कालावधीमध्ये सेवेत हलगर्जीपणा, निष्काळजीपणा व इतर काही त्रुटी उदभवल्यास त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी ही नियुक्त झालेल्या संबंधितावर राहिल व त्याचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.
14. मुलाखती बाबतचे सर्व अधिकार व हक्क, पदांचा व अटी व शर्ती बाबतचा फेरबदल करण्याचा अधिकार आणि सदर जाहिराती मधील पदे भरणे बाबत कोणताही अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त तथा प्रशासक, अहिल्यानगर महानगरपालिका यांना राहील, कोणताही किंवा सर्व अर्ज काही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवीत आहेत. व याबाबत कोणत्याही अर्जदारास त्याबाबत लेखी कळविण्यात येणार नाही.
15. उमेदवाराची निवड झाल्यानंतर मासिक मानधनावरील करारबध्द नियुक्ती झालेल्या संबंधितांनी सदरचा नियुक्ती आदेश मिळताच 7 दिवसाचे आत संबंधित विभागात हजर व्हावे लागेल अन्यथा सदर दिलेला नियुक्ती आदेश तात्काळ संपुष्टात आलेबाबत समजण्यात येईल.
16. सदर करारबध्द नियुक्त झालेल्या संबंधितांनी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असलेबाबतचे तसे लेखी करारपत्र रु. 100/- च्या मुद्रांकावर साक्षांकित करुन देणे बंधनकारक आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यांचे मान्यतेने.

अहिल्यानगर महानगरपालिका
आस्थापना विभाग
अहिल्यानगर

Signed by Meher Gangadhar Lahare
Date: 04-03-2025 15:22:58

सहा.आयुक्त,आस्था.
अहिल्यानगर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner